# D 1 शैक्षणिक सहल

दिनांक १७/०२/२०२६ मंगळवार पहाटे ०५.०० ते

दिनांक १८/०२/२०२६ बुधवारी सकाळी ०८.००

एकुण गुण ५० (३० + २०)

## अनुक्रमणिका

| अ.नं. | तपशील | शेरा व सही |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | शैक्षणिक सहलीची उद्दिष्टये | |
| ३ | सहल ठिकाण<br>१) वाईचा गणपती<br>२) मॅप्रो गार्डन<br>३) टेबल लॅण्ड<br>४)वेण्णा लेक<br>५) ऑथर पाईट<br>६) इको पाईट<br>७) सावित्री पाईट<br>८) टाईगर पाईट<br>९) श्री क्षेत्र महाबळेश्वर मंदिर दर्शन<br>१०) महाबळेश्वर मार्केट खरेदी<br>११) स्ट्रॉबेरी खरेदी<br>१२) राजभवन जेवण<br>१३)इतर फोटो वैयक्तिक सामुहिक<br>१४) कोल्हापूर कडे रवाना | |

# D 1 शैक्षणिक सहल अहवाल

# वाई, पाचगणी, महाबळेश्वर

# दिनांक १७ फेब्रुवारी २०२६

छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविदयालयातील द्वितीय वर्ष चतुर्थ सत्रामध्ये अध्यापन कार्य करणाऱ्या छात्र-अध्यापकांची शैक्षणिक सहल शैक्षणिक नियोजनामध्ये (Academic Caender) प्रमाणे फेब्रुवारी - मार्च महिन्यात निश्चित करण्यात आली होती. त्याप्रमाणे सदर सहल १७ फेब्रुवारी २०२६ मंगळवार रोजी पहाटे ५.०० वाजता जाण्याचे निश्चित केले. सदर सहलीचे नियोजन त्याप्रमाणे २ फेब्रुवारी पासूनच सुरु होते. त्यासाठी कोल्हापूरातील तोडकर यांची श्री साई गणेश ट्रॅव्हल्स निश्चित करण्यात आली होती. गाडी क्रमांक MH ०९ GM ९१२९ असा होता. गाडीचे ड्रायव्हर श्री.सुरेश अडसुळे हे अनुभवी होते. कारण सहलीचे ठिकाण वाई, पाचगणी जुने- नवे महाबळेश्वर निश्चित करण्यात आले होते. घाटाचा, डोंगर दऱ्याचा मार्ग असल्याने अनुभवी चालकाची नितांत गरज होती. सदर सहलीसाठी कै.बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्टबरोबर योग्य तो पत्रव्यवहार करुन पूर्व परवानगी घेण्यात आली होती. मोठया ट्रॅव्हल्स घाटात न्यायला-वळवायला अडचणी येतात. त्यामुळे एक ट्रॅव्हल्स ३५ सिटर व दुसरी ट्रॅव्हल्स २५ सिटर करण्यात आली होती. विदयार्थ्यांकडून NOC लिहून घेण्यात आली होती. सदर सहल बी.एड. च्या प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रमातील भाग असून ती ५० गुणासाठी आहे. ३० गुण सहलीतील प्रत्यक्ष सहभाग व २० गुण सहलीचा अहवाल लेखनासाठी (अनुक्रमणिका, उद्दिष्टये, कार्यवाही, शैक्षणिक उपयोजन)

सहलीची उदिष्टये पुढीलप्रमाणे :-

१)सामाजिक वातावरणात समायोजन करण्यास मदत करणे.

२)संप्रेषण, आंतरव्यक्ती  संबंध, समस्या निराकरण इ. जीवनकौशल्यांचा विकास होण्यास मदत करणे.

३)शैक्षणिक सहलीच्या आयोजनाचे ज्ञान होण्यास मदत करणे.

४)अध्ययन- अध्यापनासाठी समाजस्त्रोतांच्या वापराचे ज्ञान होण्यास मदत करणे.

शैक्षणिक सहलीची पुर्वपिठीका विदीत केल्यानंतर १७ फेब्रुवारीचा २०२६ चा दिवस उजाडला. रुकडीच्या असपासच्या हेरले, अतिग्रे, कुंभोज, इचलकरंजी, जयसिंगपूर, शिरोळ, कोल्हापूर, औरवाड, बस्तवाड इ.भागातून विद्यार्थी येणार असल्यामुळे महाविदयालयाच्या पटांगणावार सकाळी ५.०० वाजताची वेळ छात्रांना दिलेली होती. गाडीची पूजा - नारळ फोडणे या धार्मिक प्रक्रिया पुर्ण करुन गाडीने कूच करायला ६.०० वाजले




सकाळी ९.०० वाजता वाईमध्ये कृष्णा नदीच्या घाटावर महागणपतीचे दर्शन घेतले. गणपतीला बुंदीचे लाडू, काळी दाक्षाचा प्रसाद दिला. मुलांनी घाटाचे निरीक्षण केले गणपतीचे माहात्म जाणून घेतले. सदर घाट फिल्म इंडस्ट्रितील  लोकांना प्रिय असल्याचे समजून घेतले सरगम, गंगाजल, छावा या सारख्या सुप्रसिध्द चित्रपटांचे शुटींग वाईच्या घाटावर व वाईच्या परिसरात झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.



पार्किंगचे भाडे देऊन गाडया पाचगणी टेबललॅण्डकडे रवाना झाल्या. विद्यार्थी टेबललॅण्डवर फिरुन आशिया खंडातील टेबल सारखे पठार असल्याचे भौगोलिक महत्व- रचना त्यांनी जाणून घेतली. घोडेस्वारी खुप महाग असल्याने विदयार्थ्यांनी ते करण्याचे टाळले, त्यानंतर गाडी पुन्हा पाचगणीतील मॅप्रो गार्डनकडे रवाना झाली. याठिकाणी छात्राध्यापकांनी मॅप्रो गार्डनमधील विविध सरबातांचा, बिस्किटांचा, चॉकलेटचा आस्वाद घेतला, ऑफर असणारे प्रॉडक्ट खरेदीवर त्यांनी भर दिला. स्वत:च्या लहान मुलांसाठी त्यांनी स्ट्रॉबेरीच्या आकाराच्या पिलो खरेदी केल्या. त्यावर ५० % डिसकाऊंट होता.




सातार्‍यातच मुलांना गरम पोहयाचा नाष्टा, बुंदीचे लाडू, चिवडा, काळी द्राक्षे असा नाष्टा पुरविण्यात आला होता. त्यामुळे काही काळ छात्राध्यापकांचा पोटोबा शांत होता. त्यात मॅप्रो गार्डनमधील पाणीयुक्त, दुधयुक्त सरबतानी तो आणखी शांत झाला होता. मॅप्रो गार्डन सर्वांनी फिरुन बघून अनेक फोटो काढले.





त्यानंतर गाडी महाबळेश्वर- वेण्णालेक कडे रवाना झाली. महाबळेश्वरात प्रवेशालाचा कर भरुन पावती घेतली त्यानंतर या ठिकाणीही मुले Horse riding  खूप महान असल्यामुळे बसले नाहीत त्यानंतर बोटीचे बुकींग करुन मुलांना वेण्णालेकमध्ये नौकाविहारचा अनुभव देण्यात आला. तेथे पर्यावरणाची काळजी खूप घेत असल्याचे जाणवले लेकचे पाणी अत्यंत स्वच्छ होते. दरवाज्यात स्ट्रॉबेरी, गाजर, बीट, मुळा, मका, कणसे विक्रते बसले होती.






हे सर्व होईपर्यंत पाच वाजले होते. यानंतर मुलांना ऑर्थर सिट, एको पॉईट बघण्यासाठी नेले. या पॉईट मागच्या आख्यायिका त्यांन सांगण्यात आला. टकमक पॉईट सर्वानीच बघण्याचे टाळले.




त्यांनतर गाडी श्री क्षेत्र महाबळेश्वर कडे रवाना झाली. ज्याठिकाणी कृष्णा, वेण्णा, सावित्री, भागिरथी, कोयना अशा पाच नदयांचा संगम होतो. सावित्री १२ वर्षांनी तर भागिरथी ६० वर्षांनी उमग पावते. नुकताच त्याठिकाणी कृष्णेचा महोत्सव पार पाडला होता. या पाच नदयांचे पाणी गोमुख्यातून एका कुंडात पडते. पाणी अंत्यत गार व शुदध होते. त्यामुळे सर्वांचा थकवा दूर झाला. या ठिकाणीसुदधा अनेक फिल्मची शुटींग होतात. यानंतर तेथेच शंकराचे स्वयंभू मंदिर आहे. तेथे जावून सर्वांनी दर्शन घेतले. नुकतीच महाशिवरात्र झाल्यामुळे मंदिर सजवलेले तसेच होते. सर्वांना राजगिऱ्याचा लाडू प्रसाद म्हणून मिळाला. सर्वांना प्राचार्यांनी येथे चॉकलेट वगैरे खरेदी करण्यास सांगितले होते. या श्रीक्षेत्र महाबळेश्वरला अत्यंत धार्मिक महत्व आहे. तसेच ऐतिहासिक महत्व देखील आहे. शिवाजी महराजांनी आईसाहेब जिजामाता यांची व ज्यांनी प्रतापगड किल्ल्याचे बांधकाम सांभाळले ते मोरोपंत त्रिंबक पिंगळे यांची सुवर्णतुला केली ते हेच स्थान. आजही त्यांची जाणीव मनाला होते. ज्यांनी श्रीमानयोगी वाचलेले आहे त्यांच्यासमोर तो इतिहास लगेच उभा राहतो.




यानंतर गाडी पुन्हा महाबळेश्वर बाजारपेठेकडे रवाना झाली. रात्रीचे ८.०० वाजले होते. एक तास मुलांना खरेदीसाठी दिले. सर्वांनी मनसोक्त खरेदी केली. तरी त्यांचे मन भरत नव्हते. चप्पल, पर्स, विविध वस्तू काय वर्णन करावे त्या वस्तूचे त्यानंतर प्राचार्य भोसले ए.व्ही. यांनी स्थानिक शेतकऱ्याबरोबर फोनद्वारे चर्चा करुन स्ट्रॉबेरीची खरेदी पक्की केली. साधारण सर्वांच्या मागणीनुसार ५०-६० किलो स्ट्रॉबेरी इतर मार्केटमधील दर ४०० रुपये किलो असताना तो १८० रुपये प्रमाणे शेतातील ताज्या स्ट्रॉबेरीज रात्री ९.३० वाजता जागेवर मुलांना मिळवून दिल्या व महाबळेश्वर - पाचगणीच्या बाजारपेठेबरोबर व्यवहार करुन तेथील शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आणि विदयार्थ्यांचाही  फायदा करुन दिला.

यानंतर आम्ही सर्व रात्रींचे जेवण करण्यासाठी शासकीय ठिकाण राजभवन कडे रवाना झालो. प्रवेशद्वारावर तेथील लोकांनी आम्हाल अडवले तुम्हाला आत जाता येणार नाही. मग त्यांना आम्ही परवानगी घेतल्याचे सांगितले. पूर्व नियोजनाप्रमाणे सोनाली रेस्टॉरंटमध्ये आमच्या जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती. ज्यामध्ये पुढील पदार्थाचा समावेश होता. पुरी, जीरा राईस, फोडणीचे वरण, कोशींबीर, कोथींबीर वडी, आलू-मटर टोमॅटो ग्रेव्ही, पापड लोणचे, दहीवडा, गुलाबजामून.



जेवण अत्यंत रुचकर होते. तसेच या राजभवनचे महत्व म्हणजे त्याठिकाणी मुख्यमंत्री व राज्यपालांचे निवासस्थान आहे. १ मे ते ३० मे पर्यंत हे दोन्ही बंगले बुक असतात. राज्यपाल या काळात महाबळेश्वरमध्ये वास्तव्यास राहून तेथील स्थानिक नागरिकांचे प्रश्न समजावून घेतात व त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात. छात्रांना राज्यपालांचा तो भव्यदिव्य सभागृह दाखविण्यात आले.

सर्व विदयार्थ्यानी सहलीचा आनंदाने उपभोग घेतला. कॉलेजलाही त्यांचे सुप्त गुण त्यामुळे दिसले. अशा तऱ्हेने रात्री ११.०० ते १२.०० वाजता मुलांकडून Feedback form भरुन घेतले व रात्री १२.१५ ला गाडी मेढा मार्गे रुकडीकडे रवाला झाली सकाळी ठीक ५.०० वाजता गाडी रुकडीमध्ये आली. सर्व विदयार्थ्यांचे पालक मुलांना न्यायला आले होते.

अशाप्रकारे शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून छात्राध्यापकांना, भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक, पर्यावरणीय, आर्थिक, राजकीय अंगाना परीसस्पर्श करणारी त्यातून व्यवहारज्ञान देणारी व एका शिक्षकासाठी सहल आयोजित करावयची तर कोणकोणत्या बाबीचा विचार करावा लागतो. अशी समृध्द अनुभव देणारी शैक्षणिक सहल छ.शिवाजी शिक्षणशास्त्र महाविदयालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आयोजित केली व सुखरुप परत आणली. याअहवालामध्ये सहलीचे काही छायाचित्रे जोडलेली आहेत. जेणेकरुन सहलीचा प्रत्यक्ष अनुभव नजरेसमोर उभा राहतो.